अतितर्वय/तात्काळ/महत्वाचे

अति.महा.आयुक्त (वि) कार्यालय
आस्थापना विभाग, पुणे मनपा
जा.क्र. - अतिमआ(वि)/साप्रवि/आस्था/ ९७९२
दिनांक - २८/०६/२०१७

- कार्यालयीन आदेश -

विषय :- माहिती तंत्रज्ञान विभागाकडील FMC कक्षाकडे सेवकवर्गाची नियुक्ती करणेबाबत.

संदर्भ :- महापालिका आयुक्त कार्यालयाचे कार्यालयीन आदेश जा.क्र. मआ/1315, दि. 30.12.2015

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील माहिती व तंत्रज्ञान विभगांतर्गत Feedback & Monitoring (FMC) कक्ष स्थापन करण्यात आला असून सदर कक्षाकडे संदर्भांकित कार्यालयीन आदेशान्वये सेवक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

दि.१५/०५/२०१७ रोजी मे. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागामार्फत PG पोर्टल वरील तक्रारींबाबत आढावा घेण्यात आला असुन सदर कामकाजासाठी आवश्यक असल्यास ज्यादा कर्मचारी नियुक्त करून अथवा संबंधित अधिकाऱ्यांचा कॅम्प लावून तक्रारी निकाली काढणेबाबत सक्त निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने पुणे मनपा प्रशासनाकडील **लिपिक टंकलेखक** संवर्गातील खालील सेवकांची **माहिती व तंत्रज्ञान विभगांतर्गत असलेल्या Feedback & Monitoring (FMC) कक्षाकडे** कामकाजासाठी नेमणूक करण्यात येत आहे.

अ.क्र.	सेवकाचे नाव	सध्याचे खाते
१	श्री. घाग राजेंद्र काशिनाथ	मलनि:सारण व देखभाल दुरुस्ती विभाग
२	श्री. खिलारे विकास सुदाम	टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय

वरील सेवकांनी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या नियंत्रणाखाली FMC कक्षामार्फ़त यापूर्वी सुरु असलेल्या PMC Grievance पोर्टल व PG पोर्टलवरील तक्रारी याव्यतिरिक्त आपले सरकार पोर्टल ऑनलाईन तक्रारींचे कामकाज एकाच कक्षामार्फत करावयाचे असून त्यांनी मा. महापालिका आयुक्त, मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) यांचे नियंत्रणाखाली कामकाज करावयाचे आहे

वरील सेवकांना या कार्यालयीन आदेशान्वये **माहिती व तंत्रज्ञान विभगांतर्गत असलेल्या Feedback & Monitoring (FMC) कक्षाकडे तात्काळ रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात येत आहे.** यासाठी स्वतंत्र कार्यमुक्ती आदेशाची आवश्यकता नाही.

वरील सेवकांचे महिनेमहाचे वेतन त्यांचे मुळ नेमणूक खात्याने आदा करावयाचे आहे.

तरी सर्व संबंधित खातेप्रमुख / प्रशासन अधिकारी यांनी पुढील योग्य ती तजवीज करावी.

(प्रेरणा देशभ्रतार)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

प्रत/- संबंधीत मा. खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजवीजीसाठी रवाना...

(प्रकाश बोरसे)
उप आयुक्त (सा.प्र.)
पुणे महानगरपालिका